वर्ष-०८ | अंक-३२ | मुंबई, मंगळवार २८ जून ते ०४ जुलै - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024


# पोलीस बातमी पत्र


पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक



PG 2 — गिरणी कामगारांच्या 2 हजार 521 घरांची सोडत रखडली

3 → स्वतःचे नग्न फोटो गावातील महिलांना व्हॉट्सॲपवरुन पाठवायचा; पोलिसांनी ठोकल्या बेड्या

प्रेमात अडसर ठरणाऱ्या तरुणाचा खून; ३ तासांतच पोलिसांनी लावला गुन्ह्याचा छडा ← 4



www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page


# बांधकाम विभागाचे खड्डे भरणीच्या कामाकडे दुर्लक्ष

## डोंबिवलीत रिक्षा चालकांकडून श्रमदानातून रस्त्यावरील खड्डे भरणी



पालिकेच्या डोंबिवली विभागातील बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगूनही डोंबिवली पश्चिमेतील खड्डे भरणीची कामे केली जात नाहीत. त्यामुळे संतप्त झालेल्या डोंबिवली पश्चिमेतील रिक्षा चालकांनी सोमवारी सकाळी अर्धा वेळ रिक्षा बंद ठेऊन रस्त्यावरील खड्डे भरण्याची कामे केली. कोट्यवधीचा अर्थसंकल्प असलेल्या पालिककडे खड्डे भरण्यासाठी निधी नाही का, असे प्रश्न रिक्षा चालकांकडून खड्डे भरणीसाठीचा प्रकार पाहून प्रवासी, पादचारी उपस्थित करत होते. पावसाळ्यापूर्वी खड्डे भरण्याची कामे पूर्ण करण्यासाठी मार्च-एप्रिलमध्ये शहर अभियंता विभागाकडून निविदा प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असते. शहर अभियंताकडून त्याची अंमलबजावणी केली जात नाही. पावसाळापूर्वी खड्डे भरण्याची कामांचे प्रस्ताव अद्याप निविदा प्रक्रियेत आहेत. या कामासाठी ठेकेदार नियुक्त करण्यात आले नसल्याने प्रभागातील बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना प्रवासी, रिक्षा, खासगी वाहन चालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. डोंबिवली पश्चिमेत रस्त्यावरील चऱ्या, खड्डे माती, खडी टाकून तात्पुरती बुजविण्याची कामे अधिकारी करत आहेत. सततच्या वर्दळीमुळे, पावसाने खडी, माती निघून गेल्याने रिक्षा चालकांना या खड्ड्यांचा त्रास होत होता. खड्ड्यात प्रवासी बसलेली रिक्षा आपटून रिक्षेचा आस तुटण्याची भिती असते. इतर भाग खिळखिळे होत आहेत. एखादा भाग तुटला की त्यासाठी दोन ते तीन हजार रुपयांचा फटका ...पान २ वर...

# ५६ लाख रुपये खर्च करा, ५० कोटी रुपये नोटांचा पाऊस पडेल

## डोंबिवलीतील विकासकाची ढोंगी बुवांकडून ५६ लाखाची फसवणूक




डोंबिवली- 'तुमची आर्थिक भरभराट करून घ्यायची असेल तर आम्ही पैशांचा पाऊस पाडतो. तुम्ही ५६ लाख रुपये केले तर ५० कोटी रुपये नोटांचा पाऊस पाडून दाखवू,' असे ढोंगी बुवाबाजी करणाऱ्या एका टोळक्याने डोंबिवलीतील एका विकासकाला सांगितले. या विकासकाने बुवांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन ५६ लाख रुपयांची तजवीज करून घरात ५० कोटी रुपयांचा पाऊस पाडण्यासाठी पुजापाठासाठी चार ढोंगी बुवांना घरात घेतले. या बुवांनी विकासकाला गुंगी तंत्राचा अवलंब करून मोहीत केले आणि पुजेच्या नावाखाली विकासकाच्या कार्यालयातील ५६ लाख रुपयांची रोख रक्कम गोड बोलून लुटून नेली.

महेश (गुरुजी, पूर्ण नाव नाही), अशोक गायकवाड, रमेश मोकळे, शर्मा गुरूजी, गणेश (पूर्ण नाव, पत्ता माहिती नाही) अशी चार ढोंगी बुवांची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले, सुरेंद्र पांडुरंग पाटील (५१, रा. अनुसया निवास, महाराष्ट्र बँकेच्या वर, चोळेगाव, ठाकुर्ली) हे विकासक आहेत. त्यांचे दावडी येथील पाटीदार भवन श्री एकविरा स्वप्ननगरी इमारत येथे कार्यालय आहे. तेथेच निवासाचीही व्यवस्था आहे. गेल्या महिन्यात विकासक सुरेंद्र पाटील यांना महेश या ढोंगी बुवाने संपर्क...पान २ वर...

# मालवणीत विवाहीत महिलेची हत्या




मालवणी येथे २४ वर्षीय विवाहीत महिलेचा संशयास्पद मृत्यू झाला असून शवविच्छेदन अहवालात महिलेचे तोंड व गळा दाबून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मालवणी पोलिसांनी सोमवारी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला. शाहिदाबेगम झुबेर आलम असे मृत महिलेचे नाव आहे. मालाड मालवणी येथीलअनारकली गेट क्रमांक ७ येथे हा प्रकार घडला, अशी माहिती पोलिसांनी दिली. एक महिला बेशुद्धावस्थेत असल्याचा दूरध्वनी शनिवारी पोलीस नियंत्रण कक्षाला आला होता. त्यांनी याबाबतची माहिती मालवणी पोलिसांना दिल्यानंतर पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यावेळी तेथील घरात महिलेचा पती झुबेर नौशाद आलम होता. त्याने शाहिदा गेल्या दोन दिवसांपासून आजारी असल्याचे पोलिसांनी सांगितले. बेशुद्धावस्थेत असलेल्या महिलेला शताब्दी रुग्णालयात दाखल ...पान २ वर...

# बंडखोर मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे संबधीत खाती इतर मंत्र्यांकडे; मुख्यमंत्र्यांचा मोठा निर्णय



मुंबई : राज्यातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी सरकारने महत्वाचा निर्णय घेतला आहे. लोकांची कामे खोळंबून राहू नये तसेच पावसाळ्यात अतिवृष्टी होणे, आपत्तीच्या घटना अशा परिस्थितीत विभागांची कामे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अनुपस्थित पाच मंत्री आणि चार राज्यमंत्री यांच्याकडील खाती इतर मंत्र्यांना सोपविण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे.

महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीतील नियम 6-अ मध्ये 6-अ अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणत्याही कारणामुळे आपली कामे पार पाडणे शक्य नसेल त्यावेळी मुख्यमंत्र्यांस आपल्या अनुपस्थितीत आपली सर्व किंवा कोणतीही कामे पार पाडण्याबाबत इतर कोणाही मंत्र्यास निर्देश देता येईल. त्याचप्रमाणे जेव्हा एखाद्या मंत्र्याला आपली कामे पार पाडणेशक्य नसेल तेव्हा त्या मंत्र्याच्या अनुपस्थितीत मुख्यमंत्र्यास इतर कोणाही मंत्र्याला त्याची सर्व किंवा काही कामे पार पाडण्याबाबत निदेश देता येईल अशी तरतूद आहे त्याप्रमाणे हा निर्णय घेण्यात आला आहे.

संबंधित मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडील विभागांचे काम त्यांच्या नांवासमोर दर्शविण्यात आलेल्या मंत्री व राज्यमंत्री यांचेकडे पुढील आदेशापर्यंत सोपविण्यात येत आहे.

मंत्र्याकडील खातेवाटपात बदल :


एकनाथ शिंदे यांच्याकडील नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खाती सुभाष देसाई यांच्याकडे, गुलाबराव रघुनाथ पाटील यांच्याकडील पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे खाते अनिल दत्तात्रय परब यांच्याकडे, दादाजी दगडू भुसे यांच्याकडील कृषि व माजी सैनिक कल्याण खाते तसेच संदिपान आसाराम भुमरे यांच्याकडील (रोजगार हमी, फलोत्पादन खाते शंकर यशवंतराव गडाख यांच्याकडे, उदय ...पान २ वर...

# नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या कल्याणमधील सेवकाची फसवणूक

## बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




कल्याण- 'आपण अलिबाग जवळील रेवदंडा येथील सद्गुरू नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमधील सेवेकरी आहोत. श्री सेवेचा भाग आपणास देण्यात आला आहे. आपण खूप मोठे गृहस्थ आहोत,' अशी खोटी बतावणी करून कल्याणमधील प्रतिष्ठानच्या एका श्री सदस्याची भुरट्याने पाच हजार रुपयांची फसवणूक केली आहे. विश्वजीत अनिल कदम (३५, रा. दत्त सोसायटी, आंबेडकर रोड, कल्याण पश्चिम) या सेवकाने बाजारपेठ पोलीस ठाण्यात श्री सदस्याच्या नावे संपर्क करणाऱ्या श्रीकांत गोविंद भोईर (रा. रेवदंडा, अलिबाग) या भुरट्या विरुध्द फसवणुकीची तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. पोलिसांनी सांगितले, रेवदंडा येथील श्रीकांत भोईर याने विश्वजीत यांच्या मोबाईलवर संपर्क केला. आपण खूप मोठे गृहस्थ आहोत. रेवदंडा येथील नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानशी आपण संबंधित आहोत. आपल्यावर श्री सेवेचा भाग देण्यात आला आहे, अशी खोटी माहिती श्रीकांतने तक्रारदार विश्वजीत यांना दिली. प्रतिष्ठानशी संबंधित श्री सदस्य आपणाशी बोलतो म्हणून विश्वजीत यांनी त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. तुमच्यावर येणारी सर्व संकटे दूर करीन असे सांगून श्रीकांतने विश्वजीत यांच्याकडे पैशाची मागणी केली. पैसे दिले नाही तर आपल्यावरली संकटाची व्याप्ती वाढेल, असे सांगितले. यामुळे घाबरलेल्या विश्वजीत यांनी...पान २ वर...

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार २८ जून ते ०४ जुलै - २०२२


पृष्ठ १ वरुन

### बांधकाम विभागाचे खड्डे

बसतो. डोंबिवली पश्चिमेतील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मागणी अनेक वेळा बांधकाम अधिकाऱ्यांकडे केली. त्याची दखल घेतली जात नाही. फक्त खड्डे भरण्याच्या कामाचे आदेश झाले नाहीत, अशी उत्तरे देतात. बांधकाम विभागाकडून खड्डे भरण्याची कामे वेळेत होण्याची शक्यता नाही. त्यामुळे सोमवारी सकाळी श्रमदानातून खड्डे भरण्याची निर्णय घेण्यात आला, अशी माहिती रिक्षा चालक मालक संघटनेचे शेखर जोशी यांनी दिली.प्रवासी वाहतूक थांबवून ३० रिक्षा चालकांनी खडी, माती आणली. ती महात्मा फुले रस्ता, ह प्रभाग, उमेशनगर, विजयनगर भागातील रस्ते माती, खडीने भरले. अधिक माहितीसाठी कार्यकारी अभियंता विजय पाटील यांना संपर्क केला. त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

पालिकेवर मोर्चा पालिकेकडून डांबरीकरणातून खड्डे भरणी कधी होणार विचारणा करण्यासाठी रिक्षा चालक मालक संघटनेचे कार्याध्यक्ष शेखर चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली ह प्रभाग कार्यालयासमोर रिक्षा चालक जमा झाले. ठोस आश्वासन मिळाल्याशिवाय पालिकेसमोरून न हटण्याचा निर्णय रिक्षा चालकांनी घेतला. ह प्रभाग अधिकारी अधिकारी प्रमोद पाटील रिक्षा चालकांना सामोरे गेले. पाटील यांनी रिक्षा चालकांनी आणलेल्या मोर्चाची माहिती आयुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांना कळविली. शहर अभियंता विभागात नस्ती मंजूर होण्याची प्रक्रिया संथगतीने होत असल्याने त्याचे चटके प्रवासी, रहिवाशांना बसतात, अशी दबक्या आवाजात अधिकारी चर्चा करतात. शेखर जोशी, भिकाजी झाडे, राजू गुप्ता, मुन्ना यादव, राजा चव्हाण, शिवाजी पाटील, नितीन गवळी, सुरज गुप्ता, भरत झाडे, दत्ता कदम, रवी डोंगरे, विलास बेलकर, प्रदीप शिंदे, राकेश कनोजिया हे रिक्षा चालक या उपक्रमात सहभागी झाले होते. डोंबिवली पश्चिम विभागातील खड्डे भरणीची कामे येत्या सहा दिवसात पूर्ण केली जातील. यासंदर्भात बांधकाम विभागाच्या वरिष्ठांना कळविण्यात आले आहे. - प्रमोद पाटील ,साहाय्यक आयुक्त ,ह प्रभाग, डोंबिवली

खड्ड्यांमध्ये रिक्षा सतत आपटून रिक्षा खराब होते. प्रवासी वाहतूक करत असताना रिक्षा बंद पडते. या सततच्या खड्ड्यातील आपटयाने रिक्षा चालकांना आठवड्यातून दोन ते तीन हजार रुपये सुट्टे भाग, दुरुस्तीसाठी खर्च करावे लागतात. येत्या सहा दिवसात खड्डे भरणी कामे झाली नाहीत तर पालिकेसमोर ठिय्या आंदोलन केले जाईल. - शेखर जोशी , कार्याध्यक्ष ,रिक्षा चालक मालक संघटना,डोंबिवली

### मालवणीत विवाहीत महिलेची हत्या

करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले. पोलिसांनी याप्रकरणी अपघाती मृत्युची नोंद केली. त्यानंतर शवविच्छेदन अहवालात महिलेचे तोंड व गळा दाबून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलीस निरीक्षक गणेश शिवरकर यांच्या तक्रारीवरून याप्रकरणी मालवणी पोलिसांनी सोमवारी अनोळखी व्यक्तीविरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला. याप्रकरणी अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### ५६ लाख रुपये खर्च करा

करून आपल्याकडे पैशाचा पाऊस पाडणारी काही माणसे आहेत. असे सांगितले होते. त्या बोलण्यावर विश्वास ठेऊन आपण अशाप्रकारचा पाऊस पाडून घेण्यास इच्छुक असल्याचे पाटील यांनी महेश यांना सांगितले होते. अशोक शंकर गायकवाड (रा. रामचंद्रनगर, कामगार रुग्णाल जवळ, वागळे इस्टेट, ठाणे) याची ओळख महेशने पाटील यांच्याशी करून दिली. अशोक नियमित पाटील यांच्या कार्यालयात येत होता. अशोकने आपला परिचित रमेश मोकळे (रा. कसारा) पैशांचा पाऊस पाडतो असे सांगून गणेश यासाठी मदत करतील असे सांगितले होते.गणेश या ढोंगी बुवाने पाटील यांना ५६ लाख रुपये खर्च केले तर त्यानंतर ५० कोटी रुपये नोटांचा पाऊस पडेल, असे सांगितले. पाटील यांनी या टोळक्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. ५६ लाख रुपयांची तजवीज करण्यासाठी पाटील यांनी घरातील सोने कल्याणमधील पारस जवाहिऱ्याकडे गहाण ठेवले. गणेश धार्मिक विधी करणार होता. गणेशने पूजा साहित्याची यादी पाटील यांना दिली. शनिवारी सकाळी पाटीदार भवन जवळील कार्यालयात पाटील यांना पूजेसाठी येण्यास सांगितले. काल सकाळी पाटील आणि त्यांचा चालक आशीष शर्मा हे सकाळी साडे पाच वाजता पोहचले. ढोंगी बुवांमधील गणेश, शर्मा गुरूजी, अशोक गायकवाड कार्यालयात उपस्थित होते. कार्यालयावरील पाटील यांच्या घरात ढोंगी गुरूजींनी पूजा मांडली. ५६ लाखाचा बटवा कुठे ठेवला आहे याची खात्री पाटील यांच्याकडून करून घेतली. सकाळी सव्वा सहा वाजता पूजा सुरू झाली. सव्वा आठ वाजता पूजा संपली.गणेश, शर्मा गुरुजींनी पाटील यांना बाजुच्या खोलीत ध्यान मग्न होऊन जप करण्यास सांगितले. पाटील जपाला बसताच या टोळक्याने पाटील यांनी मुलीच्या शय्यागृहात ठेवलेली ५६ लाखाची पुरचंडी गुपचूप काढून घेतली. इमारतीखाली जाऊन पूजा विधी आणि प्रदक्षिणा मारून येतो असे सांगून गुरूजी पळून गेले. बराच उशीर झाला तरी गुरूजी पूजेच्या ठिकाणी येत नाहीत. अशोक तेथे नाही. म्हणून पाटील यांनी परिसरात शोध घेतला. ते दिसून आले नाहीत. पाटील यांनी घरात येऊन पाहिले तर ५६ लाखाचा पुरचंडी गायब झाली होती. पूजापाठ करण्यासाठी आलेल्या ढोंगी बुवांनी आपणास फसविले आहे. हे लक्षात आल्यावर सुधीर पाटील यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी अंधश्रध्दा निर्मूलन कायद्याने, नरबळी कायद्याने गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

### बंडखोर मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे

सामंत यांच्याकडील उच्च व तंत्र शिक्षण खाते आदित्य ठाकरे यांच्याकडे देण्यात आले आहे. राज्य मंत्र्याकडील खातेवाटपात बदलः शंभूराज शिवाजीराव देसाई यांच्याकडील खाती संजय बाबुराव बनसोडे, राज्यमंत्री (गृह ग्रामीण), विश्वजित पतंगराव कदम, राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन, सतेज उर्फ बंटी डी. पाटील, (रा.उ.शु.), राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर राज्यमंत्री यांच्याकडील खाती विश्वजित पतंगराव कदम, राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण), प्राजक्त प्रसाद तनपुरे, राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण, वस्त्रोद्योग),सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (अन्न व औषध प्रशासन),आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) अब्दुल नबी सत्तार, राज्यमंत्री यांच्याकडील खाती प्राजक्त प्रसाद तनपुरे, राज्यमंत्री (महसूल), सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (ग्राम विकास), आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य) ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू, राज्यमंत्री यांच्याकडील खाती आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (शालेय शिक्षण), सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, कामगार), संजय बाबुराव बनसोडे, राज्यमंत्री (महिला व बाल विकास), दत्तात्रय विठोबा भरणे, राज्यमंत्री (इतर मागास बहुजन कल्याण)

### नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या

भुरट्याने दिलेल्या बँक खातेधारक ऐजाज कुरेशी याच्या खात्यावर पाच हजार रुपये गुगल पे व्दारे जमा केले. दुसऱ्या दिवशी भामटा श्रीकांत याने विश्वजीत यांच्या बहिणीला संपर्क केला. तुमचे भाऊ विश्वजीत कुठे आहेत असे विचारून पैशाची मागणी केली. बहिणीने घडला प्रकार विश्वजीतला कळविला. हे प्रकरण संशयास्पद वाटू लागल्याने विश्वजीत यांनी रेवदंडा येथे श्री समर्थ परिवार कार्यालयात संपर्क केला. तेव्हा त्यांना नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून कोणतीही देणगी स्वीकारली जात नाही. कोणत्याही प्रकारचे व्यवहार केले जात नाहीत आणि सेवेच्या रुपात कोणत्याही प्रकारची भेट, देणगी स्वीकारली जात नाही. ही माहिती मिळाल्यावर श्रीकांतने आपली फसवणूक केली आहे. हे लक्षात आल्यावर विश्वजीत देशमुख यांनी बाजारपेठ पोलीस ठाण्यात जाऊन भामटा श्रीकांत विरुध्द तक्रार केली.

## गिरणी कामगारांच्या २ हजार ५२१ घरांची सोडत रखडली




मागील दोन महिन्यांपासून गिरणी कामगारांच्या २ हजार ५२१ घरांची सोडत रखडली असून, आता ही सोडत अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते सोडत काढण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई मंडळाने घेतला होता. यासाठी मुख्यमंत्र्यांकडे वेळ मागण्यात आली आहे. मात्र आता राज्यातील राजकीय परिस्थिती स्थिर झाल्यानंतरच मुंबई मंडळाच्या सोडतीला मुहूर्त मिळण्याची चिन्हे आहेत. एमएमआरडीएच्या भाडेतत्त्वावरील योजनेतील घरे रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी करोना अलगिकरणासाठी घेतली होती. त्यामुळे ही सोडत रखडली. मात्र म्हाडा आणि एमएमआरडीएने पाठपुरावा करून ही घरे परत मिळविली. ही घरे एमएमआरडीएने म्हाडाला हस्तांतरित केली. म्हाडाने या घरांची १ मे रोजी सोडत काढण्याचे जाहीर केले होते. मात्र घरांच्या दुरुस्तीवरुन म्हाडा आणि एमएमआरडीएमध्ये वाद सुरू झाला. त्यामुळे १ मे चा मुहूर्त चुकला. मात्र शेवटी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी मध्यस्थी करून घरांच्या दुरुस्तीचा वाद मिटवल. त्यानंतर सोडतीची सर्व तयारी पूर्ण करून मंडळाने जूनच्या पहिल्या आठवड्यात उद्धव ठाकरे यांना एक पत्र पाठवून वेळ मागितली आहे. राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकांनंतर सोडतीसाठी मुख्यमंत्र्यांकडून वेळ दिला जाण्याची शक्यता होती. पण आता बंडखोरी आणि राज्यातील अस्थिर राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सोडत अनिश्चित काळासाठी रखडण्याची चिन्हे आहेत. राजकीय परिस्थिती स्थिर झाल्यानंतरच आता सोडत होईल, असे मुंबई मंडळातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे गिरणी कामगारांना आणखी काही काळ सोडतीसाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## धक्कादायक! दारूच्या नशेत मध्यरात्री वृध्द सासू-सासऱ्यांची कुऱ्हाडीने वार करून हत्या

एकाने दारूच्या नशेत आपल्या वृध्द सासू-सासऱ्यांची कुऱ्हाडीने वार करून हत्या केली असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने पत्नी आणि मुलीवरही कुऱ्हाडीने हल्ला केला. पोलिसांनी आरोपीला जवळच्या जंगल भागातून अटक केली आहे. नागपूर एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अमर नगरमध्ये ही घटना घडली. या हत्याकांडामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. कौटुंबिक वादातून ही घटना घडली असावी अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. आरोपीचे नाव नरमू यादव असे आहे. आरोपी नरमू यादव याने मद्य प्राशन केले होते. दारूच्या नशेत असलेल्या नरमू यादवने आपल्याच सासू-सासऱ्यांवर कुऱ्हाडीने प्राणघातक वार केले. या हल्ल्यात वृध्द सासू-सासरे यांचा मृत्यू झाला. भगवान खाडे आणि पुष्पा खाडे असे मृत सासू-सासऱ्यांचे नाव आहे. आरोपी नरमू यादवने पत्नी कल्पना यादव आणि मुलगी मुस्कान या दोघींनाही कुऱ्हाडीने हल्ला केला. या हल्यात या दोघीही गंभीर जखमी झाल्या आहेत. या दोघींचीही प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मागील काही दिवसांपासून कुटुंबात वाद सुरू होते. शनिवारी रात्री आरोपी नरमू यादव दारू सेवन करून आला होता. या दारूच्या नशेतच त्यांने पुन्हा जुने वाद उकरून काढले. त्यानंतर ही घटना घडली असल्याचे म्हटले जात आहे.

## दारूच्या नशेत बेधुंद, हातात रिव्हॉल्व्हर; औरंगाबादच्या जालना रोडवर नशेखोरांचा राडा




औरंगाबाद शहर नशेखोरांचा अड्डा बनला असल्याचे चित्र असतानाच याच नशेखोरांचा आता पुन्हा एक कारनामा पाहायला मिळाला आहे. दारूच्या नशेत बेधुंद असलेल्या टोळक्याने हातात रिव्हॉल्व्हर घेऊन भर रस्त्यावर दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला फोनवरून याची माहिती दिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ धाव घेत या नशेखोरांना ताब्यात घेतले आहे.


याबाबत अधिक माहिती अशी की, जालना रोडवरील रामगिरी हॉटेल भागात काही लोकांमध्ये वाद सुरु असून, त्यांच्या हातात रिव्हॉल्व्हर असल्याची माहिती काही नागरिकांनी पोलीस नियंत्रण कक्षाला दिली. त्यामुळे कंट्रोल रूममधून स्थानिक पोलिसांना याची माहिती देण्यात आली. त्यांनतर काही वेळेतच सिडको आणि मुकंदवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी पोलिसांनी राडा घालणाऱ्या पाच जणांना ताब्यात घेतले. तर याचवेळी निलेश दिहाडे याच्याजवळ एक रिव्हॉल्व्हर आढळून आली. रिव्हॉल्व्हरचा परवाना नाही... पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन सिडको पोलीस ठाण्यात नेले. त्यांनतर निलेश यांच्याकडे सापडलेल्या रिव्हॉल्व्हरच्या परवान्याबाबत पोलिसांनी विचारपूस केली असता, त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याचे समोर आले. विशेष म्हणजे तैवान बनावटची असलेली ही रिव्हॉल्व्हर निलेश याने शहरातूनच विकत घेतली असल्याची माहिती त्याने पोलीस तपासात दिली आहे. सोबतच एअरगन चालवण्याचे 15 दिवसांचे त्याने प्रशिक्षण घेतल्याचे सुद्धा समोर आले आहे. त्यामुळे या घटनेनंतर शहरात एकच खळबळ उडाली आहे. तर नलेशने कुणाकडून रिव्हॉल्व्हर विकत घेतली याचा तपास सुद्धा पोलीस करत आहे. गोळीबार झाल्याची चर्चा... जालना रोडवरील रामगिरी हॉटेलसमोर झालेल्या राड्यावेळी गोळीबार झाला असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. मात्र अशी कोणतेही घटना घडली नसून, गोळीबार झाल्याच्या प्रकार घडला नसल्याच पोलिसांनी सांगितले आहे. मात्र नशेखोर टोळीत वाद झाला असल्याच पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. तर या राड्यात एक जण गंभीर जखमी झाला असल्याचे सुद्धा समोर आले आहे.

## चाकणमध्ये 18 वर्षीय तरुणीचा गळा आवळून खून, आरोपीला अटक




पुणे : चाकणमध्ये 18 वर्षीय तरुणीचा गळा आवळून खून करण्यात आलाय. विष्णुकुमार सहा असं आरोपीचं नाव आहे तर प्रीती सहा असं मृत्यू झालेल्या तरुणीचं नाव आहे. चाकण पोलिसांनी विष्णुकुमार याला अटक केली आहे. घरात कोणी नसताना आरोपी विष्णुकुमार याने प्रीतीचा गळा आवळून तिचा खून केला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रीती आणि आरोपी विष्णुकुमार हे नाणेकरवाडी (ता. खेड) येथे शेजारीच राहत होते. प्रीतीच्या आईचा काही कारणावरून विष्णुकुमार याच्यासोबत वाद झाला होता. ते दोघे एकाच कंपनीत काम करत होते. पण वादामुळे प्रीतीची आई विष्णुकुमार याच्यासोबत बोलत नव्हती. त्यामुळे प्रीतीने देखील त्याच्याशी बोलणं बंद केलं होतं. आई बोलत नसल्याने आधीच चिडलेल्या विष्णुकुमार याने आज घरात कोणी नसताना प्रीतीचा गळा दाबून खून केला. यानंतर, विष्णुकुमार त्याच्या रुममध्ये जाऊन शांत बसला. स्थानिकांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच चाकण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संशयित आरोपी विष्णुकुमार याला ताब्यात घेतले आहे. दरम्यान, पैशाच्या देवाणघेवाणीतून हा प्रकार घडला असल्याची माहिती समोर येत आहे. प्रीत घरात झोपलेली असताना आरोपीने तिचा गळा आवळून खून केला. शेजारच्या एका लहान मुलीने खिडकीतून हा सर्व प्रकार पहिला. त्या मुलीला याबाबत कोणाला काही सागून नकोस अशी धकमी संशयित आरोपीने दिली. त्यामुळे काही काळ या लहान मुलीने कोणाला काही सांगितले नाही. परंतु, काही वेळानंतर या लहान मुलीने घडलेला सर्व प्रकार तिच्या नातेवाइकांना सांगितला. त्यामुळे हा प्रकार उघडकीस आला. चाकण पोलिसांनी आरोपी विष्णुकुमार याला अटक केली असून. या घटनेबाबत अधिक तपास सुरू आहे. विष्णुकुमार याने पैशाच्या वादातून प्रीतीचा खून केला की, यामागे आणखी काही कारण आहे, याबाबत पोलीस कसून तपास करत आहेत.

## उपराजधानी बनतेय 'हुक्का पार्लर हब'! शहरात अनेक ठिकाणी भरते नशेची मैफिल



नागपूरः कोरोना निर्बंध हटल्यानंतर महाविद्यालयातील वर्ग ऑफलाइन सुरु झाले. त्यामुळे बाहेगावाहून शिकण्यासाठी येणाऱ्या तरुणांची संख्या शहरात वाढली. याचाच फायदा घेत शहरात अनेक ठिकाणी हुक्का पार्लर सुरु आहे. धरमपेठ, बजाजनगर सारख्या शहराच्या मध्यभागी देखील हुक्का पार्लर सर्रास सुरु आहेत, हे विशेष.

**'या' भागातील कॅफेमध्ये सर्रास मिळतोय हुक्का**

हुक्का पार्लरवर बंदी आहे. मात्र शहरात प्रतापनगर, सदर, त्रिमूर्तीनगर, वर्धमान नगर, बजाजनगर, अंबाझरी, नंदनवन आदी ठिकाणी असलेल्या कॅफेमध्ये तर राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांना हुक्का दिला जातोय. सायंकाळ झाली तरुणाई याठिकाणी फक्त हुक्काची 'ट्रिप' अनुभवण्यासाठीच येथे पोहोचतात. मात्र पोलिसांची 'अर्थपूर्ण कृपा दृष्टी' असल्यामुळे या हुक्का पुरवणाऱ्यांना कुठलीही भिती नसल्याचे चित्र उपराजधानीत आहे.

**सकाळी 5 पर्यंत चालतो 'हा' हुक्का पार्लर**

शहरातील धरमपेठ भागात एक हुक्का पार्लरतर सकाळी 4-5 वाजेपर्यंत उघडा असतो. याठिकाणी सीसीटिव्हीचे जाळे आहे. शंकरनगर चौकाकडून येणाऱ्या तसेच लॉ कॉलेज चौकाकडून येणाऱ्या दोन्ही भागातून येणाऱ्या वाहनांवर या कॅफेच्या कॅमेऱ्याची नजर असते. 400 रुपयांमध्ये एक पॉट बनवून इथे दिल्या जातो. कॅफेचा शटर डाऊन असतो, ग्राहक गेल्यावर पायरीवर बसलेला मुलगा लॉक उघडून ग्राहकांना आतमध्ये पाठवून पुन्हा बाहेरून कुलुप लावतो. कॅफेच्या आतमध्ये तरुण-तरणी धुंदीत हुक्काची ट्रीप अनुभवताना दिसून येतात. शहराच्या मध्यभागी अशाच प्रकारे इतर भागातही असे हुक्का पार्लर सर्रास सुरु आहेत हे विशेष. मात्र पोलिसांकडून जाणीवपूर्वक यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे चित्र आहे.

**बारमध्ये सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर छापा**

एमआयडीसी भागातील सवाना बारमध्ये सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर गुन्हे शाखेने छापा टाकून संचालकासह पाचजणांना अटक केली. या कारवाईमुळे हॉटेल, हुक्का पार्लर चालकांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रतीक उत्तम ठाकरे (वय 34, रा. मधुबन अपार्टमेंट, खरे टाऊन), निशांत हिमांशू जोशी (वय 27, जगत मिलेनियम अपार्टमेंट, गिरीपेठ), प्रकाश मुकेश गजभिये (वय 31, जयनगर, पांढराबोडी) आणि विजय वासुदेव रामटेके (रा. विजयनगर, वानाडोंगरी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

ठाकरे यांचे वानाडोंगरी येथे सवाना बार आणि रेस्टॉरंट आहे. रविवारी तेथे सुरू असलेल्या वीकेंड पार्टीत दारूसोबत बंदी असलेला तंबाखूचा हुक्काही ग्राहकांना दिला जात होता. गुन्हे शाखेला माहिती मिळताच छापा टाकला. हुक्का सर्व्ह करताना आरोपी रंगेहात सापडले. त्यांच्याकडून हुक्क्याचे साहित्य जप्त करण्यात आले.

## प्रत्येक पोलिस ठाणेअंतर्गत अमली पदार्थ विरोधी कठोर कारवाई करा, उपायुक्त चिन्मय पंडित यांचे निर्देश




नागपूर : जगात अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यसनी लोकांची संख्या वाढते आहे. अमली पदार्थविरोधात जनजागृती करण्यासाठी जागतिक पातळीवर 26 जून रोजी 'जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन' पाळण्यात येतो. नागपूर जिल्ह्यातही अमली पदार्थ विरोधी कडक कारवाईचे धोरण जिल्हा प्रशासनाने अंबलबिले आहे. 26 जूनला विशेष कार्यक्रमाचे आयोजन पोलीस व शासनातर्फे करण्यात येणार आहे. अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या कुटुंबालाही याचा फटका बसतो. कारण, ज्या घरात अमली पदार्थांच्या आहारी गेलेली व्यक्ती असते, त्या घरात आर्थिक समस्यांसोबत मानसिक तणावाची स्थितीही निर्माण होते. त्या घराची व्यवस्थाच कोलमडून पडते. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यात या संदर्भात कडक कारवाईचे धोरण अवलंबावे असे आवाहन उपायुक्त चिन्मय पंडीत यांनी केले आहे. तीव्र अमली पदार्थ अतिशय महाग असतात. त्यासाठी खूप जास्त खर्च करावा लागतो. व्यसनी व्यक्तींना नशेसाठी पैसे कमी पडू लागल्यानंतर ते पैशाची सोय करण्यासाठी चोरी- लूटमार असे गुन्हे करायला लागतात यातून सामाजिक सुरक्षेचा प्रश्न निर्माण होते, गुन्हेगारी वाढते, त्यामुळे याकडे वेळीच लक्ष वेधणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. प्रत्येक ठाण्यात वेगळी शाखा विषय गुन्हेगारीशी संबंधित असल्याने स्वाभाविकच याचा संबंध पोलिसांशी येतो. अमली पदार्थांच्या गुन्ह्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसात एक वेगळी शाखाच उघडण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याला याबाबत पोलीस उपायुक्त (गुन्हेशाखा) यांनी जिल्हास्तरीय अमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या बैठकीतील निर्णयान्वये याबाबत सक्त सूचना केली आहे. अंमली पदार्थांच्या सेवनाने आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो, त्यामुळे प्रश्न सामाजिक आरोग्याशीही जुळला आहे. सामाजिक व आरोग्यविषयक जागृती-सेवेचे काम करणाऱ्या सामाजिक संस्थाही अमली पदार्थांच्या विरोधात जागृती करण्याचे काम करत असतात. अशा संस्थाही जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन कार्यक्रमात मोठ्या संख्येत भाग घ्यावा.

संपादकीय...



## राज्यात सत्ताखेच, दिल्लीत डावपेच

कोणत्याही स्थितीत महाराष्ट्रात सत्तेवर यायचेच, या निर्धारातून शिवसेनेला खिंडार पाडण्याची योजना भाजपच्या नेत्यांकडून शिजल्याचे सांगण्यात येते. एकनाथ शिंदे व बंडखोरांचा बोलविता धनी कोण, हेही स्पष्ट होत आहे. देशावर राज्य करायचे तर महाराष्ट्रात सत्ता पाहिजे आणि त्यासाठी काहीही करण्याची तयारीही आहे, या दृष्टीने दिल्लीत व्यूहरचना आखली गेली.

महाराष्ट्रातील राजकारणात जी उलथापालथ होताना दिसते, त्यामागे कोणतीही अदृश्य शक्ती नाही. महाविकास आघाडीचे सरकार अस्थिर करण्याचे सूत्रसंचालन दिल्लीतून सुरू आहे. २०१४मध्ये नरेंद्र मोदींचे सरकार केंद्रात आले तेव्हाच भाजपने संकल्प केला की, काँग्रेसप्रमाणे अनेक दशके या देशावर राज्य करायचे. भाजपच्या या संकल्पाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भक्कम साथ मिळाली आणि देशातील एकेका राज्यांवर भाजपचा ध्वज फडकायला लागला. ज्या राज्यांमध्ये भाजपचे सरकार नाही, तिथे साम-दाम-दंड-भेद या सूत्राचा वापर करीत सरकार आणण्यात भाजपला बऱ्यापैकी यश आले आहे. भाजपचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी १९ ऑगस्ट २०१७ रोजी आमचे सरकार पाच-दहा वर्षे नव्हे तर किमान ५० वर्षे सत्तेत असेल, अशी घोषणा केली. तेव्हा विरोधकांनी त्यांना घेरले. ५० वर्षानंतर शहा कुठे असतील, असे प्रश्न केले. परंतु त्यांच्या संकल्पात दम वाटतो. २०१४नंतरचा देश पाहिला तर बहुतांश भाग भाजपने व्यापला आहे. पक्षाध्यक्ष आणि नंतर गृहमंत्री म्हणून शहांची भाजपवरची पकड अधिक घट्ट झाली. संघटना कशी बांधावी, हे त्यांच्याकडून शिकावे. नेत्यांना, कार्यकर्त्यांना पद मिळो वा न मिळो; पक्षादेशाप्रमाणे सगळेच जिद्दीने कामाला लागतात. भाजप सरकारच्या पुढच्या ५० वर्षांचे नियोजन हेच आहे. नेता कोणाला करावे, असा प्रश्न काँग्रेसपुढे निर्माण होतो. तशी भाजपची अवस्था येत्या काही दशकात होण्याचे दूरवर दिसत नाही. टक्कल पडलेल्यांना भाजप कंगवे विकू शकतो, इतके कौशल्य त्यांच्यात आहे. त्यामुळे सरकारचे एखादे धोरण चुकले तरी ते कसे चांगले आहे आणि भविष्यात त्याचे किती उत्तम परिणाम दिसतील, हे लोकांना लीलया पटवण्यात नेते, कार्यकर्ते यशस्वी होतात.भाजपकडून पुरेपूर काळजी आठवडाभरापूर्वीचे देशातील चित्र पाहा. अग्निपथ आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांची ईडीतर्फे चौकशीने सरकारला घेरले होते. काँग्रेसजनांची देशभर आंदोलन झाली. जंतरमंतरवर भलामोठा सत्याग्रह मंच उभारला. इथे काँग्रेसचे शेकडो लोक जमतात आणि मोदींविरोधातील खदखद मांडतात. याच दरम्यान सैन्यभरतीच्या अग्निपथ योजनेला विरोध करताना देशभरातील तरुण आक्रमक झाले. देशभरातील आंदोलने, जाळपोळीने रेल्वेसेवा विस्कळीत होती. परिणामी, सरकारला 'अग्निपथ'मध्ये चारदा बदल करावे लागले. कृषी कायद्यांप्रमाणे ही योजनाच मागे घ्यावी, याकडे आंदोलन जात असतानाच महाराष्ट्रातील सत्तानाट्याने राजकारणाने देशाचे लक्ष वेधून घेतले. दूरचित्रवाणी, वृत्तपत्रांचे मथळे आणि सामाजिक माध्यमांवर एकच विषय चर्चेत आहे- शिवसेना आणि महाराष्ट्र सरकार. शिवसेना नेते एकनाथ शिंदेंचे बंड हे एका दिवसातील नाही. उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकानंतर दिल्लीत याची स्क्रिप्ट लिहिली गेल्याचे बोलले जाते. अजित पवार यांच्यासोबतचा प्रयोग फसल्यानंतर पुन्हा नामुष्की येऊ नये म्हणून भाजपच्या नेतृत्वाने यावेळी संपूर्ण काळजी घेतली. मोदी यांच्याकडून हिरवा कंदील मिळताच अमित शहा, जे. पी. नड्डा आणि देवेंद्र फडणवीस यांनी आखलेल्या चक्रव्यूहात महाराष्ट्राचे सरकार असे काही अडकले की सगळे आ वासून पाहत राहिले. उत्तर प्रदेशनंतरचे सर्वात मोठे महाराष्ट्र राज्य कसेही करून मिळवण्याचा चंग बांधला. राष्ट्रपतीपद निवडणूक, २०२४ची लोकसभा निवडणूक आणि त्यानंतरचा भाजपला गाठायचा असलेला लांब पल्ला यासाठीची ही तयारी आहे. २०१९मध्ये उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत घरोबा करणे भाजपला रुचले नाही. त्यामुळे महाराष्ट्रात केवळ सत्ताच मिळवायची नाही तर शिवसेनेला नेस्तनाबूत करण्याचेही नियोजन झाले. गेल्या दोन वर्षात शिवसेनेच्या नेत्यांना ईडीच्या नोटीस पाठवून 'येता की जाता' (तुरुंगात) असा अप्रत्यक्ष इशाराच दिला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिल देशमुख आणि नवाब मलिक यांचे प्रकरण धगधगत ठेवले. ईडीच्या कचाट्यात जाण्यापेक्षा सत्तेत जाणे सोयीचा हा मार्ग शिंदे व त्यांच्या गटाने निवडला. शिंदेंकडून दोन कारणे देण्यात आली. वित्त विभागाकडून शिवसेनेच्या आमदारांना पुरेसा निधी नाही आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचे हिंदुत्व त्यांच्या स्वप्नात येते!

# विवेकाचा गर्भपात!




शीर्षस्थ नेतृत्व वैचारिकतेत मागास असेल तर त्याने होणारे नुकसान हे नेतृत्व दूर झाल्यानंतरही कसे कायम राहते याचा दुर्दैवी प्रत्यय सध्या अमेरिका घेत आहे. तेथील सर्वोच्च न्यायालयाने गर्भ वागवण्याचा वा नाकारण्याचा महिलांचा निसर्गदत्त अधिकार अवैध असल्याचा निर्णय दिला असून या घृणास्पद निर्णयाबद्दल माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत समाधान व्यक्त केले. स्त्री ही केवळ उपभोगार्थ आहे असे मानत आपले पौरुष उधळण्यासाठी कुख्यात असलेल्या या तिरस्करणीय नेत्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आनंद झाला, याचे कारण त्यांच्या राजवटीत नेमल्या गेलेल्या न्यायाधीशांनी आपली वैचारिक बांधिलकी दाखवीत ट्रम्प यांच्या प्रतिगामित्वाशी न्यायिक हातमिळवणी केली. आपल्या कारकीर्दीत ट्रम्प यांनी अध्यक्षीय अधिकार वापरून न्यायाधीश भरण्याचा सपाटा लावला होता. सर्वसाधारण परंपरा अशी की हे न्यायाधीश नेमले जाताना सर्व घटकांस प्रतिनिधित्व दिले जाते. म्हणजे कृष्णवर्णीय, विविध विचारधारांचे आदी. ट्रम्प यांनी नेमलेल्यांतील दोनतृतीयांश न्यायाधीश हे श्वेतवर्णीयवादी होते आणि त्यातील अनेकांनी ट्रम्प यांच्या प्रशासनात वा प्रचारकार्यात अधिकारीपदे भूषवली होती. याउलट त्यांचे पूर्वसुरी बराक ओबामा यांनी केलेल्या नेमणुका. डेमॉक्रॅटिक पक्षाचे ओबामा यांच्या सर्व नेमणुका या सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि विवेकवादी होत्या. पण विवेक आणि ट्रम्प यांचा फारसा संबंध न आल्यामुळे बहुमताच्या जोरावर त्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला. त्याचे ताजे कडू फळ म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा महिलांना गर्भपात अधिकार नाकारणारा निर्णय. वास्तविक ट्रम्प यांच्याच रिपब्लिकन पक्षाने सत्तरच्या दशकात गर्भपात हा गुन्हा ठरवला जाऊ नये यासाठी प्रयत्न केले आणि त्यांस यश आले. तरुण मतदार या सुधारणेमुळे रिपब्लिकन पक्षाकडे आकृष्ट होतील असा समंजस विचार त्या वेळी त्या पक्षाच्या धुरीणांनी केला. 'येल लॉ स्कूल' प्रसृत ताज्या निबंधात हा सारा इतिहास नमूद करण्यात आला असून त्याच रिपब्लिकन पक्षाच्या सुधारणावादी वृक्षास ट्रम्प यांच्यासारखी कुजकी फळे लागली हा इतिहासाने त्या पक्षावर उगवलेला सूड ठरतो. सत्तरच्या दशकात चर्च-प्रभावित रिपब्लिकन पक्षास या सुधारणेच्या वातावरणनिर्मितीसाठी दशकभराचा काळ खर्च करावा लागला. कारण नंतर अध्यक्ष बनलेले रोनाल्ड रेगन यांचा रिपब्लिकन उदय. हे रेगनदेखील वैचारिकदृष्ट्या तसे मागासच. चर्चवादी, ख्रिश्चन धर्मतत्त्ववादी (इव्हांजेलिकल) अशांच्या पाठिंब्याची रिपब्लिकनांस मोठी आस. त्यामुळे स्त्रीच्या देहावर तिचा आणि फक्त तिचा अधिकार आहे आणि म्हणून आपल्या गर्भाशयावरही तिचीच मालकी आहे, इतकी शुद्ध भूमिका घेणे त्या पक्षास जड गेले. तथापि आपण 'इतके मागास' दिसलो आणि स्त्रियांस गर्भपात अधिकार नाकारला तर तरुणांचा पाठिंबा घालवू या विचारातून का होईना, रिपब्लिकनांनी 'गर्भपात करावयाचा की नाही हे ठरवण्याचा अधिकार फक्त संबंधित स्त्री आणि तिचे वैद्यक सल्लागार यांनाच आहे' अशी सुधारणावादी भूमिका घेतली. त्याचीच परिणती १९७३ साली 'रो वि. वेड' (जेन रो विरुद्ध हेन्री वेड) खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्त्रियांना गर्भपाताचा अधिकार देण्यात झाली. आज सुमारे ५० वर्षांनी काळाचे हे काटे उलट फिरवण्याचे पाप त्या देशातील सर्वोच्च न्यायालय करते आणि या महासत्तेच्या अध्यक्षपदी राहिलेली व्यक्ती याबद्दल निर्लज्जपणे आनंद व्यक्त करते हे सारे उबग आणणारे आहे. जगात सर्वत्रच प्रतिगाम्यांच्या पौरुषास असा बहर येताना पाहणे चिंता वाढवते. अमेरिकी समाजाभ्यासकांच्या मते गेली काही वर्षे त्या देशात जे काही प्रतिगामी राजकारण सुरू होते त्याचा हा परिणाम. प्रतिगामी हे सामाजिक विषबाधेचे काम दीर्घकाल करीत असतात. ते पाहता तेथील सर्वोच्च न्यायालयाचा गर्भपात निर्णय अपेक्षित होता. त्याबाबत अनेक माध्यमांनी, स्तंभलेखकांनी वारंवार इशाराही दिला होता. त्याची संभावना विचारधारेच्या कुंपणावर बसलेल्या अनेकांकडून 'अनाठायी आणीबाणीवादी' अशी केली गेली. म्हणजे काहीही धोका नसताना उगाचच धोका असल्याचा इशारा देणारे अशी. हे असे सर्वच समाजांत होत असते. याचे कारण अलीकडे सत्ताधीशांस फक्त आनंददूतांचा आनंदचीत्कार ऐकणेच आवडते. कोणतेही नकारात्मक वा प्रतिकूल, दोषदर्शक भाष्य करणारे यांस विरोधक आणि कधी तर राष्ट्रद्रोही मानून त्यांचा उपहास केला जातो. अमेरिकेत हेच झाले. परखड विरोधी भूमिका घेणाऱ्यांविरोधात खुद्द ट्रम्प यांनी रान उठवले. तथापि तेथील समाजमन काही प्रमाणात का असेना जागे असल्याने चार वर्षांतच ट्रम्प यांना गाशा गुंडाळावा लागला. मात्र ते गेल्यावरही त्यांच्या पापाच्या पाऊलखुणा अमेरिकी नागरिकांस भोगाव्या लागत आहेत. तो देश खरा संघराज्यवादी. त्यामुळे विविध राज्यांस स्वतःचे कायदे बनवण्याचा अधिकार असतो. तथापि सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निर्णय सर्व राज्यांना गर्भपातबंदी कायदा करण्याचा अधिकार आपोआप देतो. ही पडत्या फळाची आज्ञा गोड मानून तब्बल १३ राज्यांनी तसा निर्णय घेतलादेखील. यापैकी बहुतांश राज्ये ही रिपब्लिकनांच्या अमलाखालील आहेत हे ओघाने आलेच. रिपब्लिकन राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या गर्भपातबंदीचे स्वागत केले तर डेमॉक्रॅट्सकडील राज्यांनी हा निर्णय आपणास मंजूर नसल्याची भूमिका घेतली. याचा परिणाम म्हणून यापुढे डेमॉक्रॅट्स राज्यात केवळ गर्भपातासाठी येणाऱ्या महिलांची संख्या वाढेल असा कयास असून त्यातून एक नवीनच समस्या निर्माण होण्याचा धोका संभवतो. अमेरिकेतील गर्भधारणायोग्य वयातील सुमारे साडेतीन कोटी महिलांची यामुळे गळचेपी होणार असून त्यातील काहींना गर्भ नकोसा असेल तर त्यास वैद्यकीयरीत्या दूर करण्यासाठी डेमॉक्रॅटिक राज्यात जावे लागेल. यात आशेचा किरण म्हणजे अध्यक्ष जो बायडेन यांचे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरील निवेदन. बायडेन आपल्या प्रतिपादनात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर कठोर टीका तर करतातच पण न्यायालयाची ही 'गंभीर चूक' दुरुस्त करण्यासाठी अमेरिकी प्रतिनिधिगृहाने पावले उचलायला हवीत, असे सांगत ती पावले उचलली जातील याची हमी देतात. हे खचितच सुखावणारे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने महिलांमध्येही संतापाचा आगडोंब उसळला असून शेकडो महिलांनी न्यायालयाच्या परिसरातच ठाण मांडले. त्या देशात गर्भपातविरोधी संघटनाही प्रबळ आहेत आणि त्यास अर्थातच चर्चचा पाठिंबा आहे. हे सर्व स्वतःस 'जीवनवादी' (प्रो-लाइफ) मानतात. तसे त्यांनी मानावेही. पण ज्यांच्या शरीरात या नव्या जीवाची प्राणप्रतिष्ठा होते त्या शरीरधारकांस हे नको असेल तर अन्यांनी त्याबाबत निर्णय घेणे म्हणजे हलवायाच्या घरावर परस्पर तुळशीपत्र ठेवण्यासारखे आहे. यावर साधा तोडगा असा की ज्या कोणी महिला उदार अंतःकरणाने आपल्या गर्भाशयांत जीव वाढवू इच्छितात त्यांनी हवा तितका हा मातृत्वानंद घ्यावा. तथापि ज्या महिलांना हे मंजूर नाही, त्यांनाही त्याचे स्वातंत्र्य हवे. या संदर्भात काही सनातनी लगेच गर्भाशयातील त्या जीवाचा अधिकार वगैरे मुद्दे मांडतात. ते हास्यास्पद आहे. कारण तो जीव काही आपोआप आकारास येत नाही; त्यासाठी पुरुष आणि स्त्री यांच्या समागमाची गरज असते. म्हणजे मग 'त्या' जीवास काही वाटण्याचा संबंध येतो कोठे? आणि दुसरे असे की काही कारणांमुळे संभाव्य जीवात एखादे गंभीर व्यंग आढळले तर अशा वेळी तो जन्मास न घालणे इष्ट. पण त्यासही या 'जीवनवाद्यां'चा विरोध. हे दुर्दैवी खरेच. त्यातही अमेरिकेसारख्या देशात हे असे प्रतिगामी जिंकताना पाहून अन्य देशांतील त्यांच्या विचारबंधूंनाही चेव येतो. त्यातून केवळ मागासांची स्पर्धा सुरू होते. ती टाळण्यासाठी तरी हा विवेकाचा गर्भपात टाळायला हवा.

● ● ●

## न्यायालयाची फसवणूक करणाऱ्यांसोबत पोलिसांची पार्टी!

नागपूरः बनावट कागदपत्रांच्या आधारे गुन्हेगारांना न्यायालयातून जामीन मिळवून देणाऱ्या टोळीने गुन्हे शाखेच्या कार्यालयात दारू-कबाब पार्टी साजरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि गुन्हे शाखेचे उपायुक्त चिन्मय पंडीत यांच्या सतर्कतेने ही बाब समोर आली आहे. याप्रकरणी एका अधिकाऱ्याची तातडीने नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. या कारवाईने पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.गुन्हे शाखेने या रॅकेटचा पर्दाफाश करून यात सहभागी असलेल्या चार आरोपींना अटक केल्याची माहिती आहे. हे आरोपी तुरुंगात आहेत. पार्टीची घटना गेल्या आठवड्यात घडली. सेमिनरी हिल्स येथील गुन्हे शाखेचे युनिट-2 या प्रकरणाचा तपास करत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी अधिकारी आणि जवानांसोबत पार्टी आयोजित केली होती. आरोपींच्या हिंतचिंतकांनी पार्टीसाठी साहित्याची व्यवस्था केली. संध्याकाळनंतर आरोपी, त्याचे साथीदार आणि युनिट-2 मधील काही कर्मचाऱ्यांनी पार्टी साजरी केल्याचे सांगण्यात येते. रात्री बाहेरील लोकांची हालचाल नसल्याने पार्टीबाबत कोणालाच माहिती मिळू शकली नाही. कार्यालयाच्या आवारात सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याची खात्री युनिट-2 चे अधिकारी व कर्मचारीदेखील निश्चित होते.

दरम्यान, पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि गुन्हे शाखेचे उपायुक्त चिन्मय पंडीत यांना या पार्टीची माहिती मिळाली. त्यांनी युनिट-2च्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना खडसावले. नियंत्रण कक्षात पाठवलेल्या अधिकाऱ्याला विनाकारण शिक्षा करण्यात आल्याचे बोलले जात आहे. ज्याच्या संमतीने हा कारभार झाला त्या अधिकाऱ्यावर देखील कठोर कारवाई अपेक्षित होती. न्यायालयाची फसवणूक करून गुन्हेगारांना मदत करणाऱ्या आरोपींना चांगल्या कोठडीची सुविधा आणि पार्टीची परवानगी देणे ही अत्यंत गंभीर घटना आहे. दोषींवर कठोर कारवाई करुनच योग्य संदेश दिला जाऊ शकतो.

**मटका किंगतर्फे सत्कार!**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, फुटाळा येथील कुख्यात मटका किंग समजल्या जाणाऱ्याने दोन महिन्यांपूर्वी परिसरात सार्वजनिक भोजनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात युनिट-2 च्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला होता. याचे फोटो सोशल मीडियावर देखील शेअर केले

## स्वत:चे नग्न फोटो गावातील महिलांना व्हॉटस्ॲपवरुन पाठवायचा; पोलिसांनी ठोकल्या बेड्या

रस्त्यावर सापडलेल्या सीम कार्डच्या नंबरचा वापर करून, एका माथेफिरू तरुणाने स्वतःचे नग्न फोटो गावातील महिलांना व्हॉटस्ॲपवरून पाठवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. औरंगाबादच्या सिल्लोड तालुक्यातील शिवना गावात हा सर्व प्रकार घडला आहे. सायबर पोलिसांनी घेतलेल्या अथक प्रयत्नाने ह्या घटनेचा खुलासा झाला आहे. अभिषेक अशोक वाघ (20, रा. शिवना, सिल्लोड) असे या माथेफिरू तरुणाचे नाव असून, पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, एका तरुणाने औरंगाबाद ग्रामीण सायबर पोलिसांकडे आपल्या नावाच्या सिमकार्डचा नंबर वापरून कोणीतरी व्हॉटस्ॲपचा वापर करत असल्याची तक्रार दिली होती. विशेष म्हणजे या नंबरवरून गावातील महिलांना अश्लील फोटो सुध्दा पाठवले जात असल्याची माहिती या तरुणाने पोलिसांना दिली. विशेष म्हणजे यामुळे गावात जातीय तेड निर्माण होण्याची शक्यता सुध्दा तरुणाने वर्तवली. त्यामुळे घटनेची गंभीरता लक्षात घेत सायबर पोलिसांनी याची



माहिती थेट पोलीस अधीक्षक यांना दिली. पोलीस अधीक्षक मनीष कलवानीया यांनी तत्काळ सायबर पोलिसांना वेगाने तपास करण्याच्या सुचना केल्या. सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरु केला. तब्बल आठ दिवस सायबर पोलिसांनी त्या नंबरबाबत सर्व माहिती गोळा केली. पुढे पोलिसांच्या तपासात अभिषेक चे नाव समोर आले.

त्यांनतर पोलिसांनी सापळा रचुन साध्या वेशात त्याचे घर गाठले. तेव्हा अभिषेक परिसरातील एका किराणा दुकानावर उभा होता.

तेथेच त्याच्या मुसक्या आवळून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

**असा अडकला...**

अभिषेकला काही दिवसांपुर्वी ते सीम कार्ड बसस्थानकावर सापडले. त्याने आधी स्वतःच्या मोबाईल मध्ये तो सिमकार्ड टाकून त्याचा क्रमांक जाणुन घेतला. त्यानंतर लहान बहिणीला मोबाईलची कामासाठी गरज असल्याचे सांगून तीचा मोबाईल वापरण्यासाठी घेतला. त्यावर त्या क्रमांकाने व्हॉटस्ॲप इंस्टॉल करुन विकृत प्रकार सुरू केले. मात्र सुरवातीला नंबर जाणून घेण्यासाठी त्याने सिमकार्ड आपल्या मोबाईलमध्ये टाकला आणि तिथेच फसला. पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास करत त्याचा शोध घेतला आणि त्याला बेड्या ठोकल्या. विशेष म्हणजे अभिषेकवर जालना पोलिसात सुध्दा गुन्हा दाखल असून, तेथील पोलीस सुध्दा त्याला तपासासाठी ताब्यात घेऊ शकतात.

## सख्या बहिणीच्या अंगावर डिझेल टाकून पेटविण्याचा प्रयत्न; जमिनीच्या वादातून घडला प्रकार

औरंगाबादच्या वैजापूर तालुक्यातील माळी घोगरगाव येथे नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आला आहे. जमिनीच्या वादातून एका भावाने आपल्या सख्या बहिणीच्या अंगावर डीझेल टाकून तिला पेटवून देण्याचा प्रयत्न केला. मात्र बहिणीने कसाबसा आपला जीव वाचवत पळ काढल्याने मोठा अनर्थ टळला. याप्रकरणी वीरगाव पोलीस ठाण्यात बहिणीच्या तक्रारीवरून भावासह सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलमा अनिसोद्दीन सय्यद (वय 66 वर्षे) असे तक्रारदार बहिणीचे नाव असून, सिकंदर सय्यद लाल तांबोळी असे हल्ला करणाऱ्या भावाचे नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, सलमा सय्यद या सेवानिवृत्त नर्स असून, त्यांची वैजापूर तालुक्यातील माळी घोगरगाव शिवारातील गट नंबर 178 मध्ये शेतीजमीन आहे. मात्र याच जमिनीवरून त्यांचा व त्यांचे भाऊ सिकंदर सय्यद लाल तांबोळी यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून जुना वाद आहे. दरम्यान सलमा या गुरुवारी शेतात ट्रॅक्टर लावून कपाशीची लागवडीसाठी मशागत करत होत्या. त्यावेळी त्यांचा भाऊ सिकंदर हा कुटुंबीयांसह तेथे आला. हे शेत आमचे आहे, असे म्हणत त्यांनी शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यांनतर संतापेल्या सिकंदरने कॅनमधील डिझेल ट्रॅक्टरवर तसेच सलमा सय्यद यांच्या अंगावर टाकून त्यांना पेटविण्याचा प्रयत्न केला. पण सलमा यांनी कसाबसा आपला जीव वाचवून तेथून पळ काढला. या प्रकरणी सलमा सय्यद यांच्या फिर्यादीवरून सिकंदर तांबोळी, रियाज तांबोळी, उमरा बेगम सिकंदर तांबोळी, इलियास सय्यद लाल शेख, नाजीम सिकंदर तांबोळी व सजमा तांबोळी या सहाजणांविरुद्ध वीरगाव ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या एका प्रकरणात एका तरुणाला भांडणात मध्यस्थी करणे चांगलेच महागात पडले आहे.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २८ जून ते ०४ जुलै - २०२२


# धर्मशाळा खरेदीच्या नावाखाली सेवानिवृत्त मुख्याध्यापिकेला तब्बल 76 लाखांचा गंडा




धार्मिक यात्रेकरिता गेलेल्या सेवानिवृत्त मुख्याध्यापक महिलेची आंध्र प्रदेशातील एका व्यक्तीनं थोडीथोडकी नाहीतर तब्बल 76 लाख रुपयांनी फसवणूक केली आहे. ही घटना वर्ध्यातील आरती टॉकीज येथील विद्यानगर परिसरात राहणाऱ्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिकेसोबत घडली. घटना कानी पडताच आणि फसवणुकीचा आकडा ऐकून नागरिकांना धक्काच बसला. घटनेतील आरोपीनं शिर्डीतील धर्मशाळा खरेदी करण्यासाठी पैशांची मागणी करून मुख्याध्यापिका महिलेकडून वेळोवेळी पैसे उकळले. महिलेला आपली फसवणूक झाल्याचं समजताच थेट शहर पोलीस ठाणे गाठून फसवणूक झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी शहर पोलिसांनी आरोपी मेढा राजशेखर पुरुषोत्तम गुप्ता राहणार धर्मावरम, जिल्हा आनंतपूर, आंध्रप्रदेश यांच्यावर गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

**धार्मिक यात्रेदरम्यान कर्नाटकात झाली होती आरोपीशी ओळख**

वर्धा शहरातील आरती टॉकीज येथील विद्यानगर परिसरात राहणाऱ्या मंगला श्रीराम घिरणीकर (65) या केसरीमल कन्या शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयात मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. घिरणीकर या 2016 मध्ये सेवानिवृत्त झाल्या. त्यांना जगभ्रमंतीची आवड असल्यानं त्यांनी विविध प्रांतात धार्मिक यात्रा काढण्याचं ठरवलं. मंगला घिरणीकर या धार्मिक यात्रेदरम्यान कर्नाटकात पोहोचल्या. तिथे त्या कुरवपूर येथील श्रीपाद श्रीवल्लभ देवस्थानला भेट देण्यासाठी गेल्या असता त्यावेळी त्यांची ओळख आरोपी मेढा राजशेखर पुरुषोत्तम गुप्ता याच्याशी झाली. धार्मिक यात्रेचा प्रवास संपवून त्या आपल्या घरी वर्ध्याला परतल्या. त्यानंतरही आरोपी गुप्ता हा निवृत्त मुख्याध्यापिकेशी फोनवर संपर्क ठेवत असत. याकाळात त्यानं फिर्यादी महिलेचा विश्वास जिंकण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, मार्च 2017 मध्ये आरोपी गुप्ता वर्ध्याला पोहोचले आणि मंगला घिरणीकर यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. खूप चांगलं बोलून महिलेला आपल्या फसवणुकीच्या जाळ्यात ओढलं. "मी लोकांचे प्रश्न सोडवणार आहे. मला श्री साईबाबांचा आशीर्वाद आहे. शिर्डीत धर्मशाळा विकत घेण्याचा संकल्प केला आहे. त्यासाठी मला काही पैशांची गरज आहे" असं सांगून मोठ्या रकमेनं फसवणूक केली.

**पैसे परत करण्यास आरोपीची टाळाटाळ**

आरोपी गुप्ता यांच्या बोलण्यावर निवृत्त मुख्याध्यापिका मंगला बिरणीकर यांना विश्वास बसला. त्यामुळे त्यांनी शिर्डीतील धर्मशाळेच्या बांधकामासाठी पैसे देण्याचं ठरवलं. परिणामी 15 मार्च 2017 ते 2018 या कालावधीत वेळोवेळी महिलेनं गुप्ता यांच्या बँक खात्यावर पैसे पाठवले. महिलेनं तिच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, ICC बँक, बँक ऑफ इंडिया शाखा वर्धा खात्यातून 65 लाख रुपये आणि 26 मे 2018 रोजी महिला नागपूर येथे असताना राजशेखर गुप्ता याला नगदी 11 लाख रुपये दिले. एकूण 76 लाख आरोपीकडे देण्यात आले होते. पैसे जमा केल्यानंतर महिलेनं धर्मशाळा दाखविण्यास सांगितलं. मात्र ते दाखविण्यासाठी तो टाळाटाळ करू लागला. फसवणुकीच्या उद्देशानं महिलेला खोटे हॉटेल दाखविण्यात आलं. संशय आल्यावर त्यांनी पैसे परत करण्याची मागणी केली. मात्र आरोपी पैसे देण्यास टाळाटाळ करीत होता. आपली फसवणूक झाल्याचं लक्षात आल्यावर आरोपीविरुद्ध दाखल झालेल्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी राजशेखर गुप्तावर गुन्हा दाखल केला आहे. आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणी अधिक तपास करणार असल्याची माहिती आहे.

# पार्सल घेऊन हॉटेल-धाब्यावर बसणाऱ्यांनो सावधान, कारण आता पोलीस थेट...

## शहरात वाढत्या नशेखोरीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आयुक्तांनी कडक पाऊल उचलले आहे.



गेल्या काही दिवसांपासून औरंगाबाद शहरात नशेखोरांची संख्या वाढली असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पोलीस आयुक्त निखील गुप्ता यांनी कडक पाऊल उचलत कारवाईचा धडाका लावला आहे. दरम्यान पोलीस आयुक्तांनी एनडीपीएस पथकाची नियुक्ती केली होती. त्यामुळे शहराला नशेमुक्त करण्यासाठी या पथकाने अनेक कारवाया केल्या आहेत. तर आयुक्तांनी आता 'अवैध मद्य विक्री विरोधी पथका'ची स्थापना केली आहे. त्यामुळे आगामी काळात पार्सल घेऊन हॉटेल-धाब्यावर बसणाऱ्यांवर थेट कारवाई होण्याची शक्यता आहे.

शहरात अवैध दारू विक्री वाढली आहे, दारूची साठवणूक आणि हॉटेल-धाब्यावर दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे प्रकार वाढले आहेत. याठिकाणी दारू पिऊन अनेकजण गुन्हेगारी कृत्य करत असल्याचे सुद्धा काही घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे आता शहरातील नशेखोरीला आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तांनी 'अवैध मद्य विक्री विरोधी पथका'ची स्थापना केली आहे.

**एनडीपीएस पथकाची दमदार कारवाई...**

औरंगाबाद शहरात गेल्या काही दिवसांपासून नशेच्या बटण गोळ्याची विक्री मोठ्याप्रमाणावर वाढली आहे. गल्लीबोळात सुद्धा सहज या गोळया उपलब्ध होत आहे. त्यामुळे भर रस्त्यावर टोळक्यांचा धिंगाणा, लुटमारसारख्या घटना वाढल्या होत्या. तर काही ठिकाणी खुनाच्या घटना सुद्धा समोर आल्या होत्या. त्यामुळे पोलीस आयुक्तांनी एनडीपीएस पथकाची स्थापना केली. या पथकाने जोरदार कामगीरी करत अनेक कारवाया केल्या आहेत. तर गुजरातमधून शहरात येणाऱ्या नशेच्या गोळयाचा कनेक्शन सुद्धा उघड केले आहे. त्यात आता अवैध दारू विरोधात सुद्धा पथक स्थापन करण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

**असा असणार पथक...**

'अवैध मद्य विक्री विरोधी पथका'च्या प्रमुखपदी सहायक निरीक्षक ज्ञानेश्वर अवघड, तर अंमलदार मनोज चव्हाण, सुनील जाधव, नितेश सुंदर्डे, अभिजित गायकवाड, परशुराम सोनवणे, आरती कुसाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना तत्काळ त्यांच्या पदावरून कार्यमुक्त करून पथकाचे काम सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्यामुळे पथकाकडून कारवाईला सुरवात करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

# प्रेमात अडसर ठरणाऱ्या तरुणाचा खून; 3 तासांतच पोलिसांनी लावला गुन्ह्याचा छडा



कोल्हापूर : प्रेमात अडसर ठरणाऱ्या एका 19 वर्षीय तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना कोल्हापूरात घडली आहे. प्रियसीला वारंवार त्रास देण्याच्या कारणावरून प्रियकराने रागाच्या भरात तिघा मित्रांच्या मदतीने मिळून चाकूने भोकसून या तरुणाचा खून केला आहे. कोल्हापूरातील साळोखेनगर परिसरात कोपार्डेकर हायस्कूलसमोर असलेल्या माळावर ही घटना घडली. संकेत सर्जेराव पाटील (रा. शिवगंगा कोलनी, साळोखेनगर) असे या मृत तरुणाचे नाव आहे. तर शिवराज चंद्रकांत बंडगर (वय 22), रोहित नामदेव कांबळे (वय 19) आणि प्रतीक विजय कांबळे असे अटक केलेल्या तिघा संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी घटनेचा तपास केला असता काही तासांतच परिस्थीती त्यांच्या लक्षात आली आणि पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, संकेत हा प्रतीकच्या प्रेयसीच्या मागे लागला होता. त्यामुळे तो तिचा पाठलाग करायचा. हाच राग मनात धरून रागाच्या भरात प्रतीकने संकेतला जिवे मारण्याचा डाव आखला. खरंतर संकेत हा गेल्या काही दिवसांपासून कोल्हापूरातील अध्यमनगर परिसरात नोकरी करत होता. तो इथेच साळोखेनगर परिसरातील शिवगंगा कॉलनीमध्ये चुलते दिलीप पाटील यांच्याकडे राहत होता. चुलते माजी सैनिक असून मध्यवर्ती बसस्थानक येथे सुरक्षारक्षक म्हणून काम करत आहेत. रात्री उशिरा संकेत जेवून घराबाहेर पडला. तेंव्हा त्याला संशयित तिघांनी कोपार्डेकर हायस्कूल शाळेच्या समोरच असलेल्या माळावर बोलावून घेतले. आणि काही समजण्याच्या आतच चाकूने वार करून निर्घृणपणे हत्या केली. जेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी नागरिक आले तेव्हा याठिकाणी त्यांना मृतदेह आढळला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास केला असता अवघ्या काही तासांत त्यांनी याचा छडा लावत तिघांना अटक केली. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# सायबर गुन्ह्यातून फसवणूक

## लैगिंक शोषण करण्याचं प्रमाण वाढलं, वाचण्यासाठी 'या' टीप्स फॉलो करा, मुंबई पोलिसांचं आवाहन



अलीकडे मोबाईल आणि इतर इलेक्ट्रॉनीक उपकरणांचा वाढता वापर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे जितके फायदे आहेत, तसेच त्याचे तोटेही आहेत. सर्वकाही डिजीटल होत असल्याने सायबर गुन्हेही वाढले आहेत. त्यामुळे सर्वांनीच काळजी घेणं गरजेचं झालं असून याप्रकारच्या सायबर फसवणूक आणि लैंगिक शोषणातून वाचण्यासाठी मुंबई पोलिसांनी काही टीप्स शेअर केल्या आहेत, त्याबद्दल सविस्तर जाणून घेऊ...

**खालील टीप्स फॉलो करा आणि सायबर फसवणूक, लैंगिक शोषणापासून वाचा -**

- कोणत्याही अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारु नका.
- कोणत्याही अनोळखी नंबरवरुन आलेले व्हिडीओ कॉल उचलू नका.
- आपले खाजगी फोटोज सोशल मीडियावर शेअर करु नका.
- ऑनलाईन चॅटिंग करताना खाजगी प्रकरणांवर बोलणं टाळा.
- धमकी देणारे ईमेल डिलीट न करता पुरावा म्हणून पोलिसांकडे सादर करण्यासाठी ते तसेच ठेवा.
- आपली खाजगी माहिती जसंकी घरचा पत्ता, फोन नंबर,ईमेल अॅड्रेस हे सारं ऑनलाईन सोशल मीडियावर शेअर करु नका.
- आपले खाजगी पासवर्ड कुठेही शेअर करु नका.
- प्रायव्हसी सेटिंग जसेकी पासवर्ड कायम कठीण ठेवा, जेणेकरुन ते हॅक करता येणार नाहीत.
- कोणतेही फोटो पोस्ट करताना विचारपूर्वक करा.
- कोणीही चूकीचे किंवा संशयास्पद मेसेज पाठवत असल्याच त्याला त्वरीत ब्लॉक करुव रिपोर्ट करा.
- अनोळखी अॅड्रेसवरुन आलेले ईमेल ओपन करु नका, त्यात व्हायरस असण्याची शक्यता आहे.

तर वरील ज्या काही टीप्स मुंबई पोलिसांनी शेअर केल्या आहेत, त्या पाळणं अत्यंत सोपं असल्याने आपण सर्वजण या नक्कीच फॉलो करु शकतो.

तसंच कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास पोलिसांशी संपर्क साधणंही तितकच महत्त्वाचं आहे. हे सर्व करुन आपण सायबर गुन्ह्यांना नक्कीच आळा घालू शकतो.

# रेल्वेत नोकरीचे आमिष दाखवून नोकरदाराला लावला 12 लाखांचा चुना




ठाणे: तक्रारदार जगन्नाथ यांचा मुलगा अक्षय याला नोकरीची गरज होती. त्यामुळे आरोपी रमेशचंद पाशी याने अक्षय याला रेल्वेत नोकरीस लावतो, असे अमिष दाखवून जगन्नाथ यांच्याकडून रोखीने स्वत:चे खात्यावर पैसे टाकण्यास भाग पाडले. तसेच त्याची पत्नी ज्योती हिच्याकडे रोख स्वरूपात देण्यास सांगितले. तसेच त्याचे मित्र विठ्ठल पिचड, शुभम पाटील, विनोद नवनांगे आणि किशोर पाटील यांच्याही बँक खात्यावर पैसे पाठवण्यास सांगितले. 15 जानेवारी ते ऑगस्ट 2019 या दरम्यान झालेल्या व्यवहारात जगन्नाथ कांबळे यांच्याकडून तब्बल 11 लाख 95 हजार 700 रूपये रमेशचंद पाशी याने उकळले. (an employee 12 lakh cheated) मात्र आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जगन्नाथ कांबळे यांनी रमेशचंद पाशी या भामट्याच्या विरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी रमेशचंद पाशी या भामट्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. या संदर्भात वरिष्ठ पोलिस निरीक्षक बशीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार दत्ता गोडे अधिक तपास करत आहेत.

# सतत मोबाईल वापरल्यामुळे पतीकडून पत्नीवर कटरने वार



मुंबई- दहिसर परिसरामध्ये एका 45 वर्षीय व्यक्तीने पत्नी सतत मोबाईवर टीव्ही मालिका पाहणे आणि जेवण देण्यास उशीर झाल्याने संतप्त झालेल्या आरोपी नवऱ्याने त्याच्या पत्नीच्या शरीरावर पेपर कटरने दहा वार केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी रात्री घडली आहे. जखमी महिलेला शताब्दी रुग्णालयात (Shatabdi Hospital) भरती करण्यात आले असून तिच्यावर डॉक्टरांकडून उपचार सुरू आहे. या प्रकरणात आरोपीला शुक्रवारी अटक करण्यात आली आहे. आरोपीला महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता 27 जूनपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी फिरोज मुजावर हा दहिसर पूर्वेतील न्यू एकता सोसायटीत राहणारा आहे. त्याच्या पत्नीचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता, कारण ती तिच्या फोनवर बराच वेळ घालवत होती. तो राग डोक्यात धरून आरोपीने पत्नीवर वार केले आहे. पोलिसांनी बोरवली महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता त्याला 27 जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.नेमकं काय आहे प्रकरण - रात्री 12.30 वाजण्याच्या सुमारास मुजावर घरी आले आणि त्यांनी जेवण वाढण्यास सांगितले. त्याची पत्नी कथितपणे तिच्या मोबाईलवर टेलिव्हिजन मालिका पाहत होती आणि तिने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. ज्यामुळे तो संतापला. त्यानंतर मुजावर याने ड्रॉवरमधून पेपर कटर उचलून पत्नीवर हल्ला केला आणि तिच्या हातावर चेहऱ्यावर आणि पाठीवर दहापेक्षा जास्त वार केले आहेत. हा संपूर्ण प्रकार त्यांची 19 वर्षांची मुलगी राहिजा हिच्यासमोर घडला आहे. तिने पोलीस नियंत्रण कक्षाला फोन करून या घटनेची माहिती दिली. मी माझ्या पालकांना भांडताना ऐकले, पण ते नियमितपणे भांडत असल्याने मी लक्ष दिले नाही. पण माझी आई मदतीसाठी ओरडत असल्याचे ऐकून मी घाबरले, आणि काय झाले ते पाहण्यासाठी धाव घेतली. मुलीने दिलेल्या माहितीनुसार आईचा मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत होता. वडील हातात पेपर कटर धरलेले पाहून मोठा धक्का बसला. काय करावे हे कळत नव्हते. आणि 100 नबंरवर तरुणीने कॉल केला. फोन झाल्यानंतर काही क्षणात दहिसर पोलिस घटनास्थळी पोहोचले. आणि त्यांनी आरोपीला अटक केली. त्यांच्या पत्नीला तातडीने शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अधिकाऱ्याने सांगितले की जेव्हा ते घटनास्थळी पोहोचले तेव्हा त्यांना सोफ्यावर रक्ताचे थैमान दिसले. किशोरी तिच्या आईच्या जखमा पुसत होती, तर आरोपी एका कोपऱ्यात बसला होता. 19 वर्षीय तरुणीने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार की तिच्या आईला तिच्या मोबाईलवर टेलिव्हिजन मालिका पाहण्याचे व्यसन होते.

# तब्बल 286 किलो उच्च प्रतीचा गांजा जप्त; मुंबई एनसीबीची मोटी कारवाई, दोघे जेरबंद



मुंबई एनसीबीनं मोठी कारवाई करत तब्बल 286 किलो गांजा जप्त केला आहे. आंतरराज्यीय अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या सिंडिकेटवर कारवाई करताना NCB मुंबईने सोलापूर-मुंबई महामार्गावर 286 किलो गांजा जप्त केला आहे. अंदाजे 3.5 कोटी रुपए किमतीचा हा उच्च दर्जाचा गांजा जप्त केला आहे. प्राथमिक तपासात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणासह विविध राज्यांमध्ये पसरलेल्या आंतरराज्यीय ड्रग सिंडिकेटचा सहभाग असल्याचे उघड झाले आहे. हे सिंडिकेट मुंबईतील किमान 20 वेगवेगळया ड्रग्ज तस्कर गटांना मोठ्या प्रमाणात गांजाचा पुरवठा करत असे समजले आहे. हे गट ग्राहकांना कमी प्रमाणात गांजा पुरवत असल्याची माहिती आहे. तसेच ते उच्च दर्जाचा गांजा थेट आंध्रप्रदेश, तेलंगणामधील सोर्सकडून मोठ्या प्रमाणात खरेदी करत आणि मुंबईतील रस्त्यावरील पेडलर्सच्या गटांना पुरवायचे, अशी माहिती एका अधिकाऱ्यानं दिली आहे.

मुंबई एनसीबीला अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या सिंडिकेटबाबत माहिती मिळाली होती. मुंबई शहरात अमली पदार्थांची मोठी खेप येणार असल्याची माहिती त्यांना गुप्त सूत्रांकडून मिळाली होती. यानंतर एनसीबीच्या टीमनं 26 जूनच्या रात्री आणि 27 जूनच्या पहाटे फील्ड ऑपरेशन राबवलं. एनसीबीच्या टीमनं दोन दिवस सोलापूर-मुंबई महामार्गावर सापळा रचला. यावेळी त्यांना दोन प्रवासी असलेले एक संशयास्पद वाहन आढळून आले. त्यांनी या वाहनाला थांबवत तपासणी केली. तपासणीत कारमध्ये तपकिरी रंगाच्या चिकट टेपची 95 पाकिटे लपवून ठेवल्याचे आढळून आले.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898